SUPPLEMENT

TO THE

BOMBAY GOVERNMENT GAZETTE.

Published by Authority.

TUESDAY, 18TH MARCH 1862.

PROCEEDINGS OF THE LEGISLATIVE DEPARTMENT, BOMBAY.

THE following extract from the Proceedings of His Excellency the Governor of Bombay in Council, assembled for the purpose of making Laws and Regulations, is hereby published for the information of all whom it may concern :—

Saturday, 15th March 1862.

The Council of the Governor of Bombay, for the purpose of making Laws and Regulations, met according to adjournment.

PRESENT:—

THE HONORABLE MR. FRERE,
THE HONORABLE MR. WESTROPP,
THE HONORABLE MR. TRISTRAM,
THE HONORABLE MR. RUSTOMJEE JAMSETJEE JEJEEBHOY,
THE HONORABLE MR. JUGGONATH SUNKERSETT,
THE HONORABLE MR. PREMABHAI HEMABHAI,
THE HONORABLE MR. SCOTT,
THE HONORABLE MR. ROBERTSON,
And the DEPUTY SECRETARY.

Mr. FRERE being the only Ordinary Member of Council present, presided in the absence of the Governor.

Mr. ARCHIBALD DAVID ROBERTSON having been appointed Acting Chief Secretary to Government, and having thus, on the resignation of Mr. B. H. Ellis, become an additional Member of the Council of the Governor of Bombay for the purpose of making Laws and Regulations, took the usual affirmation.

The PRESIDENT said that the first subject for the consideration of the Council was a "Bill for regulating the establishment of Markets and Fairs," the second reading of which was adjourned at the last meeting.

The PRESIDENT asked if any Member had any objections to the Bill.

No objections being urged, the President requested the Deputy Secretary to read the Bill.

A Bill for Regulating the Establishment of Markets and Fairs.

Preamble.

WHEREAS the establishment of new Markets or Fairs in the neighbourhood of places where Markets or Fairs have been previously established leads to disputes between the owners of the lands on which such new and previously established Markets or Fairs are held, and such disputes not unfrequently occasion breaches of the peace, and serious inconvenience to the frequenters of such Markets or Fairs ; It is enacted as follows :—

No new Market or Fair to be established without permission of Magistrate of the District.

I. After the passing of this Act, no person shall establish a new Market or Fair, without permission, in writing, from the Magistrate of the District. If any person shall attempt to establish a new Market or Fair without such licence, he shall, on conviction by the Magistrate, be subject to a fine not exceeding two hundred Rupees, or in default of payment to simple imprisonment for any period not exceeding two Calendar months.

Application for permission.

II. When any person desires to establish a new Market or Fair, he shall make application in writing to the Magistrate of the District. The application shall specify the name of the place at which it is proposed to establish such new Market or Fair ; the days on which it is to be held ; the name of the place where the nearest existing Market or Fair is held, and the days on which it is held ; the distance, in English miles, between the two places, and the reasons of the applicant for desiring to establish the new Market or Fair.

Issue of Proclamation and Notice.

III. On receipt of the application the Magistrate shall issue a Proclamation, stating the desire of the applicant to establish a Market or Fair at the place named by him, and the days on which it is proposed to be held, and calling upon any person who may have any objection to the establishment of the Market or Fair to state his objection in writing within six weeks from the date of the Proclamation. The Proclamation shall be affixed in a conspicuous place in the Village or Town in or near to which it is proposed that the new Market or Fair shall be held ; and a copy of the same shall be affixed at the Police Station within the jurisdiction of which the Village or Town is situate, and in the Court of the Magistrate. If it shall appear that any existing Market or Fair is held within a distance of four miles from the place where it is proposed that the new Market or Fair shall be established, the Magistrate shall cause a Notice to the effect of the Proclamation to be served upon the owner of the land where such existing Market is held. The Proclamation and Notice (if any) shall be issued and served at the expense of the applicant.

Magistrate's order.

IV. If, within the time specified in the Proclamation and Notice (if any) no objection is preferred to the establishment of the proposed Market or Fair, the Magistrate of the District shall pass an order permitting it to be established. If, within the time specified, any objection is preferred, the Magistrate of the District shall inquire into the objection, and pass such order as may appear proper under the circumstances of the case.

Markets and Fairs established two years before the passing of this Act.

V. If, within six months from the passing of this Act, any objection shall be preferred to the Magistrate in respect of any Market or Fair which has been newly established within a period of two years before the passing of this Act, the Magistrate shall inquire into the objection ; and if it shall appear that such new Market or Fair has been established within a distance of four miles from any previously existing Market or Fair, and that the establishment of the new Market or Fair has been the cause of disturbances or other inconvenience to the people of the neighbourhood, the Magistrate of the District may, if he think necessary, change the days upon which such new Market or Fair is held, or, at his discretion, order that it be discontinued.

Appeal.

VI. Every order passed by a Magistrate under this Act shall within six weeks be open to appeal to the Commissioner of Police, and the order of the Commissioner shall be final.

Penalty for contravening, disobeying, or opposing order.

VII. Every person who shall contravene, disobey, or oppose any order duly made under this Act, shall be liable to a fine not exceeding two hundred Rupees, or in default of payment to imprisonment of either kind for any period not exceeding two calendar months.

Act not to apply to Islands of Bombay and Colaba,

VIII. This Act shall not extend to the Islands of Bombay and Colaba.

Or to religious assemblages.

IX. Nothing in this Act shall be held to apply to assemblages of people collected at or concerned in the inauguration of sacred edifices or collected at or concerned in any other religious festivals or ceremonies not forming a part of a Fair or Market.

Act not to restrict the general powers of Government to control the orders of the Commissioner of Police in regard to Markets or Fairs.

X. Nothing in this Act shall be held to restrict the general powers of Government to control the orders of the Magistrate or Commissioner of Police in regard to Markets or Fairs.

Interpretation of the word "Magistrate" when used alone.

XI. The word "Magistrate" when used alone without the addition of the words "of the District" includes every Officer authorized to exercise the full powers of the Magistrate.

The Bill was read a second time and passed.

The President said the next subject for consideration was the further report of the Select Committee on a "Bill for the Preservation of the Bhagdaree and Nurwadaree Tenures."

The Deputy Secretary read the Report of the Select Committee.

"Further Report of the Select Committee appointed to consider and report on a 'Bill for the Preservation of the Bhagdaree and Nurwadaree Tenures.'

The Committee determine to recommend that this Bill, as further amended by them as follows, be adopted :—

A Bill for the Preservation of the Bhagdaree and Nurwadaree Tenures.

Preamble.

Whereas it has been found that the permanence of the tenures, known as the Bhagdaree and Nurwadaree tenures, which have existed from time immemorial in certain parts of the Presidency of Bombay, is endangered by the increasing practice of attachment and sale by civil process of the homesteads and building sites ("Gubhan") appertaining or appendant to the constituted Bhags or the recognised sub-divisions of such Bhags or Shares in Bhagdaree or Nurwadaree Villages.

And whereas it is desirable to prevent the alienation, assignment, mortgaging, charging, or incumbering of any portion of any Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share, or the alienation, assignment, mortgaging, charging, or incumbering of any homestead, building site (Gubhan), or premises appurtenant or appendant to any such Bhag or Share or recognized sub-division separately or apart from such Bhag or Share or recognized sub-division ; It is therefore enacted as follows :—

No portion of a Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village to be liable to seizure, sequestration, attachment, or sale by the process of any Civil Court.

I. No portion of a Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognised sub-division of such Bhag or Share shall, from and after the passing of this Act, be liable to seizure, sequestration, attachment, or sale by the process of any Civil Court, and no process of such Court shall be enforced so as to cause the dismemberment from any such Bhag or Share or recognized sub-division thereof of any homestead, building site (Gubhan), or premises, appurtenant or appendant to such Bhag or Share or recognized sub-division thereof.

Whenever any such process has issued it shall be lawful for the Collector of the District to move that such process be set aside or quashed.

II. Whenever any process has issued out of any Civil Court for the seizure, sequestration, attachment, or sale of any portion of a Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share, or for the seizure, sequestration, attachment, or sale of any homestead, building site (Gubhan), or premises, appurtenant or appendant to such Bhag or Share or recognized sub-division thereof, it shall be lawful for the Collector or other Chief Revenue Officer of the

District in which any such Bhagdaree or Nurwadaree Village is situated, although not a litigating party, to move in such Civil Court that such process shall be set aside or quashed, and that the provisions of this Act be put in force; and if such Court be of opinion, on the evidence adduced by the Collector or other Chief Revenue Officer of the District on such motion, that the case is one falling within this Act, it shall set aside or quash such process, and cause the provisions of this Act to be put in force; and it is hereby further enacted that any order which the said Court may make on such motion shall be appealable in the same manner as a decree of the Court in which it is made.

And the Court shall set aside or quash such process if it be of opinion that the case is one falling within this Act.

III. It shall not be lawful to alienate, assign, mortgage, or otherwise charge or incumber any portion of any Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share, or to alienate, assign, mortgage, or otherwise charge or incumber any homestead, building site (Gubhan), or premises, appurtenant or appendant to any such Bhag or Share or recognized sub-division as assigned or appurtenant thereto, apart or separately from any such Bhag or Share or recognized sub-division thereof. Any alienation, assignment, mortgage, charge or incumbrance contrary to the provisions of this Section shall be null and void. And it shall be lawful for the Collector or other Chief Revenue Officer of the District, whenever he shall, upon due inquiry, find that any person or persons is or are in possession of any portion of any Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share in violation of any of the provisions of this Section, summarily to remove him or them from such possession, and to restore the possession to the person or persons whom the Collector shall deem to be entitled thereto, and any suit brought to try the validity of any order or orders which the Collector may make in such matter must be brought within three Calendar months after the execution of such order or orders.

It shall not be lawful to alienate, assign, mortgage, or otherwise charge or incumber any portion of any Bhag or Share in any Bhagdaree or Nurwadaree Village other than a recognized sub-division of such Bhag or Share.

It shall be lawful for the Collector or Chief Revenue Officer of the District summarily to remove any person or persons who may be in possession of any portion of any Bhag or Share as aforesaid.

IV. And it is hereby further declared that nothing in this Act contained shall be construed as prohibiting the issue and execution of any such process as aforesaid against any Bhag or Share, or recognized sub-division of any Bhag or Share in any such village as aforesaid, conjointly and in the gross with its homestead, building site (Gubhan), and other proper appurtenances, if the issue and execution of such process be in other respects authorized by law.

Act not to prohibit the issue and execution of any process in other respects authorized by law.

V. And it is hereby further declared that nothing in this Act contained shall be construed as prohibiting the alienation, assignment, mortgaging, charging or incumbering any Bhag or Share, or recognized sub-division of any Bhag or Share in any such village as aforesaid conjointly and in the gross with its homestead, building site (Gubhan), and other proper appurtenances, if such alienation, assignment, mortgage, charge or incumbrance be in other respects warranted by law, the object and intention of this Act being to prevent the dismemberment of Bhags or Shares, or recognized sub-divisions thereof, in Bhagdaree or Nurwadaree Villages, and also to prevent the severance of homesteads, building sites (Gubhan), or other premises, appurtenant or appendant to Bhags or Shares or recognized sub-divisions of Bhags or Shares from the same or any of them."

Act not to prohibit the alienation, assignment, mortgaging, charging, or incumbering any Bhag or Share as aforesaid if in other respects warranted by law.

Mr. WESTROPP proposed some verbal amendments in the 3rd and 5th clauses.—*Agreed to.*

Mr. PREMABHAI HEMABHAI asked if it was intended that the Act should be retrospective.

Mr. WESTROPP said that the Act was silent on the subject, and therefore a Court would be bound to construe the Act prospectively.

Mr. JUGGONNATH SUNKERSETT asked for the meaning of some of the provisions of the Act.

Mr. WESTROPP explained the Act, and stated that the Act did very little more than enact what the Sudder Adawlut had already declared to be the existing law. It gave the Collector, however, though he might not be a party to the suit, power to prevent the severance of a Bhag.

The PRESIDENT, in answer to Mr. PREMABHAI HEMABHAI, said that the whole Bhag could be sold and also any recognised sub-division of it; but a sub-division not recognised could not be sold.

The PRESIDENT moved that the Bill as amended by the Select Committee, and further amended by the Council, be read a second time and passed.

The Bill was read by the Deputy Secretary a second time, and passed.

The PRESIDENT said the next subject before the Council was to consider the report of the Select Committee on a " Bill for the Restoration of the Grassias in the Ahmedabad Collectorate, and for their relief from debt."

Mr. WESTROPP said that the Committee had not met, owing to Mr. Ellis's appointment as Revenue Commissioner, N. D., and consequent inability to attend the Select Committee as an official member. The subject of the Bill was one of considerable difficulty; and, as the Committee had been directed to report progress to-day, and no progress had been made, he requested that further time might be allowed for the preparation of the Report.

The PRESIDENT proposed that Mr. Robertson be added to the Committee, and that the time for making the report be extended to next meeting.—*Agreed to.*

The PRESIDENT then informed the Council that the Rules for regulating the conduct of the business of the Council which they had suggested at a former meeting for His Excellency the President's consideration, had been assented to by His Excellency the Governor, and that therefore they were the Rules which His Excellency now intended to be observed in future meetings.

The PRESIDENT then adjourned the Meeting to Saturday the 22nd March, at 11 o'clock.

By order of His Excellency the Governor in Council,

LYTTELTON H. BAYLEY,

Deputy Secretary to Government.

Bombay Castle, 15*th March* 1862.

मुंबई येथील लेजिस्लेटिव डिपार्टमेंटाचें प्रोसिडिंग.

कायदे व कानू करण्यासाठीं बंदेगान आलीजाब मुस्तताब हजरत आनरबल् गवरनर साहेब बाहादूर जंजिरे मुंबई यांचें कोन्सिल भरलें होतें त्यावेळीं काम झालें त्यांतील खालीं लिहिलेला उतारा सर्वांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला आहे:—

तारीख १५ वी माहे मार्च सन १८६२.

कायदे व कानू करण्यासाठीं मुंबईचे गवरनर साहेबांचे कोन्सिलाची सभा आजच्या दिवसापर्यंत तहकूब केली होती त्याप्रमाणे आज पुन: भरली.

हजर.

आनरबल् फ्रीयर साहेब.
आनरबल् बेस्लाप साहेब.
आनरबल् ट्रिस्ट्राम साहेब.
आनरबल् रस्तमजी जमसेटजी जीजीभाई साहेब.
आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेब.
आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाई.
आनरबल् स्कार साहेब.
आनरबल् राबर्टसन साहेब.
आणि डेपुटी सेक्रेटरी साहेब.

कोन्सिलाचे आर्डिनरी मेंबरांपैकीं आनरबल् फ्रीयर साहेब मात्र हजर होते सबब ते गवरनर साहेब आले नव्हते ह्मणून प्रेसिडेंट झाले.—

आनरबल. आरची बाल्ड डेविड राबर्टसन साहेब हे सरकारचे आक्टिंग चीफ सेक्रेटरी झाले आणि आनरबल् बारो एलबर्ट एलिस साहेबानी काम सोडलें. यामुळें कायदे व कानू करण्याविषयींचे मुंबईचे गवरनर साहेबांचे कोन्सिलाचे आनरबल् राबर्टसन साहेब आडिशनल् मेंबर झाले. आणि त्याणी मासुल प्रमाणे प्रतिज्ञा केली.

मग प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "बाजार व मेळे स्थापण्याबाबद नियम ठरविण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा" कोन्सिलास प्रथम विचार करणें आहे. हा मसुदा दुसरे वेळीं वाचण्याचें मागल्या सभेस तहकूब केलें होतें.

या मसुद्याविषयीं कोण्या मेंबरास कांहीं हरकत घेणे असल्यास जाहीर करावी असें नंतर प्रेसिडेंट साहेबांनी विच्यारलें.

कोणी हरकत घेतली नाहीं तेव्हां प्रेसिडेंट साहेबानी डेपुटी सेक्रेटरी साहेबांस तो मसुदा वाचण्याविषयीं सांगितलें.

बाजार व मेळे स्थापण्या बाबद नियम ठराविण्या विषयींचे आक्टाचा मसुदा.

उद्देश

ज्या जागीं बाजार किंवा मेळे पूर्वीं स्थापले असतील त्यांचे शेजारीं नवे बाजार किंवा मेळे स्थापले असतां ते नवे व पूर्वीं स्थापलेले बाजार किंवा मेळे ज्या जागीं भरत असतात त्या जागांचे मालकांचे दरमियान तकरारी पडतात आणि त्या तकरारीं पासून वारंवार फिसाद होत्ये व त्या बाजारांत किंवा मेळ्यांत जाणारे येणारे लोकांस मोठी अडचण पडत्ये यास्तव खालीं लिहिल्या प्रमाणें ठरविलें आहे.

जिल्ह्याचे माजिस्ट्रेटाचे परवानगी वांचून नवा बाजार किंवा मेळा स्थापूं नये.

१ हा आक्ट ठरल्या नंतर नवीन बाजार किंवा मेळा स्थापणें तो जिल्ह्याचे माजिस्ट्रेटाची लेखी परवानगी घेतल्यावांचून स्थापूं नये. कोणी मनुष्य सदर्हू प्रकारचे परवानगी वांचून नवा बाजार किंवा मेळा स्थापण्यास यत्न करील त्यावर माजिस्ट्रेट गुन्हा ठरवील म्हणजे तो दोनशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल आणि दंड न दिला तर पराकाष्ठा दोन क्यालेंडर महिने पर्यंत नुस्ते कैदेचे शिक्षेस पात्र होईल.

परवानगी विषयीं अर्जी.

२ नवा बाजार किंवा मेळा स्थापण्याची कोणी मनुष्याची इच्छा असेल त्याणे जिल्ह्याचे माजिस्ट्रेटास लेखी अर्ज करावा. त्या अर्जांत खालीं लिहिलेला तपशील असावा. म्हणजे सदर्हू प्रमाणे नवा बाजार किंवा मेळा ज्या जागीं स्थापण्याचा इरादा असेल त्या जागेचें नाव व तो कोण कोणते दिवशीं भरावयाचा ते दिवस व अगदीं नजिकचा बाजार किंवा मेळा ज्या जागीं भरत असेल त्या जागेचें नांव व तो कोण कोणते दिवशीं भरत असेल ते दिवस व त्या दोन बाजारांमध्यें किंवा मेळ्यांमध्यें किती इंग्लिश मैलांचें अंतर आहे तें आणि नवा बाजार किंवा मेळा स्थापण्याचीं कारणें असतील तीं अर्जांत ल्याहावीं.

जाहीरनामा लावणें व सुचना देणें.

३ सदर्हू प्रकारचा अर्ज पोंचल्यावर माजिस्ट्रेटाने खालीं लिहिलेला मजकूर लिहून जाहीरनामा लावावा म्हणजे अर्जदारानें लिहिलेले जागीं बाजार किंवा मेळा स्थापण्याची त्याची इच्छा आहे व तो अमुक अमुक दिवशीं भरण्याचा बेत आहे त्यास तो बाजार किंवा मेळा स्थापण्याविषयीं ज्या मनुष्यास हरकत असेल त्याणे जाहीरनाम्याचे तारिखे पासून साहा आठवड्यांत आपली हरकत लिहून जाहीर करावी अशे मजकुराचा जाहीरनामा लावावा. ज्या गांवांत किंवा शहरांत किंवा ज्या गांवाजवळ किंवा शहराजवळ नवा बाजार किंवा मेळा भरण्याचा बेत असेल त्या गांवांतील किंवा शहरांतील लोकांचे सहज दृष्टीस पडे अशी जागेवर जाहीरनामा लावावा आणि ज्या पोलिस ठाण्याचे हुकुमतींत सदर्हू प्रकारचा गांव किंवा शहर असेल त्या पोलिस ठाण्यांत आणि माजिस्ट्रेटाचे कोर्टींत जाहीरनाम्याची नकल लावावी. ज्या जागीं नवा बाजार किंवा मेळा स्थापण्याचा बेत असेल त्या जागेपासून च्यार मैलांचे आंत बाजार किंवा मेळा भरतो असें कळून येईल तर तो बाजार किंवा मेळा ज्या जागीं भरत असेल त्या जागेचे मालकास जाहीरनाम्याचे मजकुराची सूचना माजिस्ट्रेटाने देववावी. जाहीरनाम्याचा खर्च व सूचना देणे असल्यास तिचा खर्च अर्जदाराने दिला पाहिजे.

माजिस्ट्रेटाचा हुकूम.

४. बाजार किंवा मेळा स्थापण्याचा बेत असेल तो स्थापण्या विषयीं हरकत जाहीरनाम्यांत व सुचनेंत लिहिलेले मुदतींत कोणी न केली तर तो स्थापूं देण्याविषयीं जिल्ह्याचे माजिस्ट्रेटाने हुकूम करावा. ठरविलेले मुदतींत कोणी

हरकत केली तर त्या हरकतीची चौकशी जिल्ह्याचे माजिस्ट्रेटाने करावी व प्रसंगाप्रमाणे आपणास योग्य वाटेल तसा हुकूम करावा.

हा आक्ट ठरण्यापूर्वी दोन वर्षें अगोदर बाजार व मेळे स्थापले असतील ते.

५. हा आक्ट ठरल्यानंतर साहा महिन्यांचे आंत खालीं लिहिलेले बाजारांविषयीं किंवा मेळ्यांविषयीं ह्मणजे आक्ट ठरण्याचे पूर्वी दोन वर्षांचे मुदतींत बाजार किंवा मेळे नवीन स्थापले असतील त्यांविषयीं माजिस्ट्रेटाजवळ कोणी हरकत केली तर माजिस्ट्रेटाने त्या हरकतीची चौकशी करावी आणि सदर्हू प्रकारचा नवा बाजार किंवा मेळा व पूर्वीपासून असणारा बाजार किंवा मेळा या दरमियानचें अंतर च्यार मैलांहून कमी आहे आणि नवा बाजार किंवा मेळा स्थापल्याने आसपासचे लोकांस त्रास किंवा इतर अडचण होते असें कळून येईल तर आपणास जरूर वाटल्यास ज्या ज्या दिवशीं सदर्हू प्रकारचा नवा बाजार किंवा मेळा भरत असेल ते दिवस बदलण्याविषयीं किंवा आपले नजरेस आल्यास तो बाजार किंवा मेळा बंद करण्याविषयीं हुकूम करण्याचा अधिकार जिल्ह्याचे माजिस्ट्रेटास आहे.

अपील.

६. या आक्टाअन्वयें माजिस्ट्रेटाने केलेले हुकुमावर साहा आठवड्यांत पोलिस कमिशनराकडे अपील केलें असतां चालेल. आणि पोलिस कमिशनर हुकूम करील तो आखरचा आहे असें समजावें.

हुकमाप्रमाणे न चालल्याबद्दल किंवा हुकूम अमान्य करण्याबद्दल किंवा हुकुमास हरकत केल्याबद्दल शिक्षा.

७. या आक्टाअन्वयें योग्य रितीनें हुकूम केला असेल त्याविरुध्ध कोणी मनुष्य चालेल किंवा तो अमान्य करील किंवा त्यास हरकत करील तो दोनशें रुपये पर्यंत दंडास पात्र होईल आणि दंड न देईल तर पराकाष्ठा दोन क्यालेंडर महिने पर्यंत दोहोंपैकीं कोणतेही एके प्रकारचे कैदेचे शिक्षेस पात्र होईल.

मुंबईचे व कुलाब्याचे टापूंस हा आक्ट लागू नाहीं.

८. हा आक्ट मुंबईचे व कुलाब्याचे टापूंस लागू नाहीं असें समजावें.

किंवा धर्मसंबंधी जमावांस लागू नाहीं.

९. धर्मसंबंधीं इमारतीचे संस्काराचे वेळीं एकत्र झालेले लोकांचें जमाव किंवा त्या संस्काराचे कामांत संबंध असणारे लोकांचे जमाव अथवा धर्मसंबंधीं इतर सणाचे वेळीं किंवा क्रियेचे वेळीं एकत्र झालेले लोकांचे जमाव किंवा त्यांत संबंध असणारे लोकांचे जमाव हे मेळ्यांपैकीं किंवा बाजारांपैकीं नसतील तर त्यांस या आक्टांतील कोणताही ठराव लागू आहे असें समजूं नये.

बाजारांबाबद किंवा मेळ्यांबाबद माजिस्ट्रेटानें किंवा पोलिस कमिशनरानें केलेले हुकुमावर हुकूम करण्याचा सामान्य अधिकार सरकारास आहे तो अधिकार या आक्टावरून कमी होत नाहीं.

१०. बाजारांबाबद किंवा मेळ्यांबाबद माजिस्ट्रेटाने किंवा पोलिस कमिशनरानें केलेले हुकुमावर हुकूम करण्याचा सामान्य अधिकार सरकारास आहे तो अधिकार या आक्टांतील कोणतेही ठरावावरून कमी होतो असें समजूं नये.

माजिस्ट्रेट या शब्दाचाच मात्र उपयोग केला असेल तेव्हां त्या शब्दाचा अर्थ.

११. "जिल्ह्याचा" या शब्दांवांचून माजिस्ट्रेट या शब्दाचाच मात्र उपयोग केला असेल तेव्हां माजिस्ट्रेट या शब्दांत माजिस्ट्रेटाचे संपूर्ण अधिकार चालविण्याचा आखत्यार ज्या अंमलदारांस मिळाला असेल त्या सर्व अंमलदारांचा समावेश होतो असें समजावें.

सदर्हू मसुदा दुसरे वेळीं वाचून कायम केला.

नंतर प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "भागदारी व नरवादारी वहिवाटी कायम ठेवण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याबाबद" सिलेक्ट कमिटीने आणखी केलेले रिपोर्टाचा आतां विच्यार करणें आहे.

डेपुटी सेक्रेटारी साहेबानी सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट वाचला.

"भागदारी व नरवादारी वहिवाटी कायम ठेवण्याविषयींचे आक्टाचे मसुद्या" बाबद विच्यार करून रिपोर्ट करण्याविषयीं नेमलेले सिलेक्ट कमिटीचा आणखी रिपोर्ट.

कमिटीने मसुदा आणखी सुधारला आहे त्या प्रमाणे तो कायम करावा असें कमिटीचें ह्मणणें आहे.

भागदारी व नरवादारी वहिवाटी कायम ठेवण्या विषयीचे आक्टाचा मसुदा.

उद्देश. भागदारी व नरवादारी वहिवाटी म्हणून ज्या वहिवाटी मुंबई प्रेसिडेन्सीचे कित्येक भागांत पूर्वापार चालत आल्या आहेत त्या खालीं लिहिलेले कारणामुळें कायम राहाणे कठीण आहे म्हणजे, भागदारी किंवा नरवादारी गांवांचे भाग केले असतात त्या संबंधी किंवा त्या भागांचे पोटभाग मंजूर केले असतात त्या पोटभागां संबंधी घरठाणे व इमारतीच्या जागा म्हणजे गभाण असतें तें दिवाणी कोर्टाचे हुकुमावरून जप्त करून विकण्याची चाल वाढत चालली आहे त्यामुळें कायम राहाणे कठीण आहे असें नजरेस आले आहे;— आणि भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही इतर भाग दुसऱ्यास करून देण्याची किंवा खत करून लावून देण्याची किंवा गाहाणठेवण्याची किंवा त्याचर कर्ज लागू करण्याची किंवा जोखीम करून घेण्याची मनाई करणे योग्य आहे, अथवा सदर्हू प्रकारचे भागा संबंधी किंवा मंजूर केलेले पोट भागा संबंधी कोणतेंही घरठाणे किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा ठिकाण असेल तें सदर्हू प्रकारचे भागापासून किंवा मंजूर केलेले पोटभागापासून निराळेच दुसऱ्यास करून देण्याची किंवा खत करून लावून देण्याची किंवा गाहाण ठेवण्याची किंवा त्याचर कर्ज लागू करण्याची किंवा जोखीम करून घेण्याची मनाई करणे योग्य आहे यास्तव खालीं लिहिल्याप्रमाणे ठरविलें आहे.

भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागांचा कोणताही हिस्सा दिवाणी कोर्टाचे हुकुमाने जप्त होण्यास किंवा विकला जाण्यास पात्र नाहीं. १. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही हिस्सा हा आक्ट ठरल्यानंतर दिवाणी कोर्टाचे हुकूमावरून जप्त होण्यास किंवा विकला जाण्यास पात्र नाहीं, आणि कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा ठिकाण सदर्हू प्रकारचे ज्या भागाचें किंवा मंजूर केलेले पोट भागाचें असेल तें त्या भागापासून किंवा पोटभागापासून वेगळे पडे असें रितीने सदर्हू प्रकारचे कोर्टाचा कोणताही हुकूम व्हावा नये.

सदर्हू प्रकारचा हुकूम झाला असतां तो हुकूम रद्द. २. कोणतेंही भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भाग किंवा भागाचा पोटभाग, मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही हिस्सा जप्त करण्या-

करावा अशी दरखास्त करण्याचा अधिकार जिल्ह्याचे कलेक्टरास आहे.

विषयीं किंवा विकण्याविषयीं अथवा सदर्हू प्रकारचे भागासंबंधी किंवा मंजूर केलेले पोटभागासंबंधी कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा ठिकाण असेल तें जप्त करण्याविषयीं किंवा विकण्याविषयीं कोणतेही दिवाणी कोर्टातून हुकूम झाला असेल तेव्हां तो भागदारी किंवा नरवादारी गांव ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्याचा कलेक्टर किंवा इतर मुख्य रेविन्यू अंमलदार मुकद्दम्यांतील पक्षकार नसेल तथापि त्यास सदर्हू प्रकारचे दिवाणी कोर्टास खालीं लिहिल्या प्रमाणे दरखास्त करण्याचा अधिकार आहे म्हणजे, सदर्हू प्रकारचा हुकूम रद्द करून या आक्टांतील ठराव अंमलांत आणावे असी दरखास्त करण्याचा अधिकार आहे आणि मुकद्दम्यास हा आक्ट लागू आहे असें, सदर्हू प्रमाणे दरखास्त करते वेळीं जिल्ह्याचे कलेक्टराने किंवा इतर मुख्य रेविन्यू अंमलदाराने हजर केलेले पुराव्या वरून कोर्टाचे नजरेस येईल तर त्या कोर्टाने सदर्हू प्रकारचा हुकूम रद्द करावा व या आक्टांतील ठराव अंमलांत आणवावे. आणि आणखी असें ठरविलें आहे कीं कोर्टाचे हुकूमनाम्यावर जसें अपील चालतें तसेंच अपील सदर्हू प्रकारची दरखास्त झाली असतां सदर्हू प्रकारचें कोर्ट हुकूम करील त्या हुकमावर चालेल.

आणि मुकद्दम्यास हा आक्ट लागू आहे असें कोर्टाचे नजरेस येईल तर कोर्टाने सदर्हू प्रकारचा हुकूम रद्द करावा.

भागदारी किंवा नरवादारी गावांतील भागाचा मंजूर केलेला पोटभाग असेल त्याखेरीज त्या भागाचा कोणताही हिस्सा दुसऱ्यास करून देण्याचा किंवा खत करून लावून देण्याचा किंवा गाहाण ठेवण्याचा किंवा इतर रितीनें त्यावर कर्ज लागू करण्याचा किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेण्याचा अधिकार नाहीं.

३. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही हिस्सा दुसऱ्यास करून देणे किंवा खत करून लावून देणे किंवा गाहाण ठेवणे किंवा इतर रितीने त्यावर कर्ज लागू करणे किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेणे कायदेशीर नाहीं अथवा सदर्हू प्रकारचे भागा संबंधी किंवा मंजूर केलेले पोटभागा संबंधी कोणतेंही घरठाण किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा ठिकाण असेल तें त्या भागापासून किंवा त्या भागाचे मंजूर केलेले पोटभागापासून वेगळेच दुसऱ्यास करून देणे किंवा खत करून लावून देणे किंवा गाहाण ठेवणे किंवा त्यावर इतर रितीनें कर्ज लागू करणे किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेणे कायदेशीर नाहीं. या कलमांतील ठरावा विरुद्ध दुसऱ्यास करून दिलें असेल किंवा खत करून लावून दिलें असेल किंवा गाहाण ठेवलें असेल किंवा कर्ज लागू केलें असेल किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेतलें असेल तें रद्द आहे असें समजावें. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भागाचा पोटभाग मंजूर केला असेल त्या खेरीज त्या भागाचा कोणताही हिस्सा या कलमांतील कोणतेही ठरावा विरुद्ध कोणी मनुष्याचे किंवा कोणी मनुष्यांचे कबज्यांत आहे असें योग्य रितीने चौकशी केल्यावरून जिल्ह्याचे कलेक्टराचे किंवा इतर मुख्य रेविन्यू अंमलदाराचे नजरेस येईल तर त्या मनुष्याचे किंवा त्या मनुष्यांचे कबज्यांतून तो हिस्सा संक्षिप्त रितीने काम चालवून काढण्याचा आणि त्यावर अमुक मनुष्याचा किंवा मनुष्यांचा हक्क आहे असें कलेक्टरास वाटेल त्या मनुष्याचे किंवा मनुष्यांचे कबज्यांत तो परत देण्याचा अधिकार जिल्ह्याचे कलेक्टरास किंवा इतर मुख्य रेविन्यू अंमलदारास आहे. आणि कलेक्टर हुकूम करील त्याचे कायदेशीरपणाविषयीं चौकशी करण्यासाठीं फिर्याद करणे ती सदर्हू प्रकारचा हुकूम बजाविल्यापासून तीन क्यालेंडर महिन्यांचे आंत केली पाहिजे.

भागाच्या सदर्हू प्रकारचा हिस्सा कोणी मनुष्याचे किंवा मनुष्यांचे कबज्यांत असेल तो संक्षिप्त रितीने काम चालवून त्या मनुष्या पासून किंवा मनुष्यां पासून काढून घेण्याचा अधिकार जिल्ह्याचे कलेक्टरास किंवा इतर मुख्य रिविन्यू अंमलदारास आहे.

कोणताही हुकूम देऊन अमलांत आणण्याचा अधिकार इतर रितीनें कायद्यावरून असेल तो हुकूम देण्याची व अमलांत आणण्याची मनाई या आक्टावरून होत नाहीं.

४. आणि आणखी असें ठरविलें आहे कीं सदर्हू प्रकारचे कोणतेही गांवांतील भाग किंवा भागाचा पोटभाग व त्या भागा संबंधी किंवा पोटभागासंबंधी घरठाण व इमारतीची जागा म्हणजे गभाण व इतर ठिकाण असेल या सर्वां बाबद सदर्हू प्रकारचा हुकूम देवून तो अंमलांत आणण्याचा अधिकार इतर

रितीने कायद्यावरून असेल तर तसा हुकूम देऊन तो अंमलांत आणण्याची मनाई या आक्टां-तील कोणतेही ठरावावरून होते असें समजूंनये.

सदर्हू प्रकारच्या कोणताही भाग दुसऱ्यास करून देण्याचा किंवा खत करून लावून देण्याची किंवा गाहाण ठेवण्याच्या किंवा त्यावर कर्ज लागू करण्याच्या किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेण्याचा अधिकार इतर रितीने कायद्यावरून असेल तर त्या प्रमाणे करण्याची मनाई या आक्टावरून नाहीं.

५. आणखी असें ठरविलें आहे कीं सदर्हू प्रकारचे कोणतेही गावांतील भाग किंवा भागाचा मंजूर केलेला पोट भाग, घरठाण किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा इतर जें कांहीं त्या संबंधी असेल त्या सुद्धां दुसऱ्यास करून देण्याच्या किंवा खत करून लावून देण्याच्या किंवा गाहाण ठेवण्याच्या किंवा त्यावर कर्ज लागू करण्याच्या किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेण्याच्या अधिकार इतर रितीने कायद्यावरून असेल तर त्या प्रमाणे दुसऱ्यास करून देण्याची किंवा खत करून लावून देण्याची किंवा गाहाण ठेवण्याची किंवा कर्ज लागू करण्याची किंवा त्यावर कांहीं जोखीम करून घेण्याची मनाई या आक्टांतील कोणतेही ठरावावरून होते असें समजूंनये. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भाग किंवा भागाचे मंजूर केलेले पोट भाग आहेत त्यांचे आणखी हिस्से न व्हावे आणि भागा संबंधी किंवा भागाचे मंजूर केलेले पोट भागा संबंधी घरठाण किंवा इमारतीची जागा म्हणजे गभाण किंवा इतर ठिकाण असेल तें त्या भागापासून किंवा मंजूर केलेले पोटभागापासून वेगळें न पडावें हा या आक्टाचा हेतु व उद्देश आहे.

आनरबल् वेस्ट्राप साहेबानी ३ रे व ५ वे रकमेंत कांहीं शब्दांचे फेरफार करण्याविषयीं सांगितलें.

तें सर्वांनी कबूल केलें.

आनरबल् शेट प्रेमाभाई हेमाभाई यांणी विच्यारलें कीं सांगें जीं वहिवाट झाली तीस हा आक्ट लागू करण्याचा इरादा आहे किंवा कसें.

यावर आनरबल् वेस्ट्राप साहेब ह्मणाले कीं या बाबद आक्टांत कांहीं ठराव नाहीं ह्मणून पुढें ज्या वहिवाटी होतील त्यांसच मात्र हा आक्ट लागू आहे असा या आक्टाचा अर्थ कोर्टानी केला पाहिजे.

नंतर आनरबल् जगंनाथ शंकरशेट साहेबानी आक्टांतील कांहीं ठरावांचा अर्थ विच्यारला तेव्हां आनरबल् वेस्ट्राप साहेबानी आक्टाचा अर्थ समजाविला व ह्मणाले कीं सदर अदालतीने नियम ठरविलाच आहे त्या विषयीं व आणखी थोडा जास्ती या आक्टांत ठराव केला आहे. कलेक्टर मुकदम्यांतील पक्षकार नसेल तथापि भाग निराळा पडण्याची मनाई करण्याचा अधिकार या आक्टावरून कलेक्टरास आहे.

आनरबल् सेट प्रेमाभाई हेमाभाईनी विच्यारलें होतें त्याचें उत्तर प्रेसिडेंट साहेबानी असें सांगितलें कीं सगळा भाग व त्याचा मंजूर केलेला पोटभागही विकण्यास हरकत नाहीं, परंतु मंजूर केलेला पोटभाग नसेल तो मात्र विकतां येणार नाहीं.

नंतर प्रेसिडेंट साहेब असें ह्मणाले कीं मसुदा सिलेक्ट कमिटीने फिरविला आहे त्या प्रमाणें व कौन्सिलाने आणखी फिरविला आहे त्या प्रमाणे तो दुसरे वेळीं वाचून कायम करावा.

नंतर मसुदा डेपुटी सेक्रेटरी साहेबानी दुसरे वेळीं वाचला व तो कायम झाला.

मग प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं "अमदाबाद जिल्ह्यांतील गिराशिये लोकांची स्थिति पूर्ववत् प्रमाणे करण्याविषयींचे व त्यांस कर्जातून मुक्त करण्याविषयींचे आक्टाचे मसुद्याचा" विच्यार आतां कौन्सिलास करणे आहे.

तेव्हां आनरबल् बेस्टाप साहेब ह्मणाले कीं आनरबल् एलिस साहेबांची उत्तर प्रांताचे रेविन्यू कमिशनरांचे जागेवर नेमणूक झाल्यामुळें त्यांच्याने सिलेक्ट कमिटींत या हुद्याचे नात्याने मेंबर ह्मणून येववलें नाहीं यास्तव कमिटी भरली नाहीं आणि या आक्टाचे मसुद्यांतील विषय फार कठीण आहे आणि काम किती झालें याचा आज रिपोर्ट करण्याविषयीं कमिटीस फरमाविलें होतें परंतु काम कांहींच झालें नाहीं यास्तव रिपोर्ट तयार करण्यासाठीं आणखी वेळ द्यावा.

प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं कमिटींत आनरबल् राबर्टसन साहेबानी आणखी बसावें आणि रिपोर्ट करण्याची वेळ दुसरे सभे पर्यंत वाढवावी.

ही गोष्ट सर्वांनी कबूल केली.

शेवटीं प्रेसिडेंट साहेब ह्मणाले कीं कौन्सिलांत काम कसें चालवावें या विषयींचे नियम मंजूर होण्यासाठीं आलीज्या प्रेसिडेंट साहेबां कडे पाठवावे ह्मणून आपण एका मागल्या सभेंत ठरविलें होतें ते नियम आलीज्या गवरनर साहेबानी मंजूर केले आहेत यास्तव त्या नियमां प्रमाणे पुढले सभेंत वहिवाट व्हावी असा आलीज्या साहेबांचा इरादा आहे.

नंतर तारीख २२ वी शनवारचे प्रात:काळचे ११ वरां पर्यंत कौन्सिलाची सभा तहकूब ह्मणून प्रेसिडेंट साहेबानी ठरविलें.

बमुजिबे हुकूम बंदेगान आलीनवाब मुस्तताब हजरत
आनरबल गवरनरसाहेब बाहादूर दर इजलास कौन्सिल.

लिटलटन् हाली ओक बेलीसाहेब,

मुकाम जंजिरे मुंबई, डेपुटी सेक्रेटारी निसबत सरकार यांची सही.

तारीख १५ वी माहे मार्च सन १८६२.

(True translation)
VENAYEK WASSOODEW,
Oriental Translator to Government.